advt17

# महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,
## १३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७.
## कृषी तंत्र निकेतन पदविकाधारकांसाठी कृषी पदवी प्रवेश २०१७-१८
## (प्रथम वर्ष व थेट द्वितीय वर्षामध्ये)

महाराष्ट्र राज्यातील महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी व डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठ, दापोली या चारही कृषी विद्यापीठांतर्गत सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षामधील कृषी पदवी अभ्यासक्रमाच्या पहिल्या व थेट दुसऱ्या वर्षासाठी प्रवेश प्रक्रिया महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेमार्फत केंद्रीय पध्दतीने राबविण्यात येत आहे.

अभ्यासक्रमाचे माध्यम इंग्रजी भाषा राहील.

**अभ्यासक्रम, प्रवेश पात्रता व जागा**

| अभ्यासक्रम | प्रथम वर्षाकरिता प्रवेश पात्रता व जागा | थेट द्वितीय वर्षाकरिता प्रवेश पात्रता व जागा |
|---|---|---|
| बी.एस्सी.(कृषी) | कृषी तंत्र निकेतन पदविका (Agril. Polytechnic) उत्तीर्ण. | कृषी तंत्र निकेतन पदविका (Agril. Polytechnic) (खुल्या प्रवर्गासाठी किमान ६० टक्के व मागास प्रवर्गांसाठी किमान ५० टक्के गुणधारक) उत्तीर्ण. |
| | प्रवेश क्षमतेच्या १० टक्के अतिरिक्त जागा | प्रवेश क्षमतेच्या २० टक्के अतिरिक्त जागा |

सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षातील कृषी तंत्र निकेतन पदविकाधारकांसाठीची प्रवेश प्रक्रिया मे.कल्प टेक्नॉलॉजीज प्रा.लि., पुणे (केटीपीएल) यांचेद्वारा 'ऑनलाईन पध्दती'ने पूर्ण करण्यात येणार आहे. यासाठी प्रवेश माहिती पुस्तिका कृषी परिषद व 'केटीपीएल' च्या अनुक्रमे **www.mcaer.org** व **maha-agriadmission.in** या संकेतस्थळांवर **दि. १५ मे,२०१७** पासून उपलब्ध करून देण्यात येईल. प्रवेशोच्छुकांनी '**maha-agriadmission.in**' या संकेतस्थळावरून प्रवेश माहिती पुस्तिका प्राप्त करून घ्यावी. प्रवेश अर्ज दाखल करण्यासाठी अवलंबवावयाची कार्यपध्दती खालीलप्रमाणे आहे.

**प्रवेश अर्ज दाखल करण्यासाठी अवलंबवावयाची कार्यपध्दती-**

- उमेदवारांने **maha-agriadmission.in** या संकेतस्थळाद्वारे **दि. २४ मे,२०१७ पर्यंत** ऑनलाईन प्रवेश अर्ज भरावा. यानंतर प्रवेश अर्ज भरण्याची सुविधा संकेतस्थळावर उपलब्ध नसेल.
- 'ऑन लाईन' भरतांना उमेदवाराचे पासपोर्ट आकाराचे सध्याचे छायाचित्र, उमेदवाराची स्वाक्षरी, आवश्यक ती संबंधित मूळ कागदपत्रे स्कॅन करून संकेतस्थळावर अपलोड करावीत.
- प्रवेश अर्ज किंवा कागदपत्रे हातबटवडयाने / टपालाने / कुरीअरने पाठवू नयेत.
- प्रवेश अर्ज भरतेवेळी प्रवेश अर्जाचे शुल्क डेबिट कार्ड, क्रेडीट कार्ड किंवा नेट बँकीगद्वारे भरावे.

**प्रवेश अर्ज दाखल करण्यासाठी भरावयाचे शुल्क-**

खुल्या प्रवर्गासाठी रु. १०००/-

आरक्षित प्रवर्गासाठी रु. ५००/- (अ.जा., अ.ज., वि.जा*, भ.ज*, इ.मा.व*, वि.मा.व*.)

[*उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र अनिवार्य.]

प्रवेश क्षमता, आरक्षण इत्यादी सविस्तर तपशिलाचा अंतर्भाव असलेली प्रवेश माहिती पुस्तिका उपरोक्त संकेतस्थळांवर उपलब्ध करून देण्यात आली आहे.

क्र. मकृप/शिक्षण-१/१४१७/११५८/२०१७

दिनांक- १२ मे,२०१७

स्वाक्षरीत/-

**महासंचालक**

महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे